लोकसत्ता

WWW.LOKSATTA.COM
पुणे, शनिवार, ९ मार्च २०१९

## दि कोल्हापूर स्टील लिमिटेड

किर्लोस्कर ग्रुप कंपनी
**नोंदणीकृत कार्यालय :** पुणे-बेंगलोर हायवे,
शिरोली (पुलाची), ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर - ४१६ १२२
सीआयएन : U27106MH1965PLC013212

Kirloskar
Enriching Lives

प्रिय भागधारक,

कंपनीच्या बिकट आर्थिक स्थितीमुळे २०१२-१३ पासून आपल्याकडील समभागांवरील (शेअर्स) लाभांशाच्या रूपाने आपल्याला लाभाचे वाटप करणे शक्य झालेले नाही. कंपनीचे समभाग कोणत्याही शेअर बाजारामध्ये नोंदलेले नसल्यामुळे व संदर्भ किंमत कळत नसल्यामुळे सभासदांना त्यांच्या समभागांची विक्री करणे अवघड झाले आहे त्यामुळे या समभागांची विक्रीची शक्यता कमी आहे. म्हणून कंपनीने 'कृती योजनेद्वारे' तिच्या समभाग भांडवलाचे एकत्रीकरण करून कंपनी भागधारकांना समभाग विकून बाहेर पडण्याची संधी देण्याचे ठरविले आहे.

या कृती योजनेमध्ये सध्याच्या रू.१/- (रू. एक फक्त) किंमतीच्या १०,००० समभागांचे, रू. १०,०००/- (रू. दहा हजार फक्त) किंमतीच्या १ समभागामध्ये एकत्रीकरण केले जाईल. या एकत्रीकरणानंतर रू.१/- (रू. एक फक्त) किंमतीच्या १०,००० पेक्षा कमी समभाग धारण करणारे समभागधारक, अपूर्णांकी समभाग धारण करण्यास अपात्र ठरतील व या कृतीतून निर्माण होणारे अपूर्णांकी समभाग, कंपनीच्या संचालक मंडळाने नेमलेल्या विश्वस्तांकडे हस्तांतरीत केले जातील. हे विश्वस्त असे सर्व अपूर्णांकी समभाग, स्वतंत्र अर्थान्वीक्षकांनी दिलेल्या मूल्यांकन अहवालातील किंमत किंवा एखाद्या भावी ग्राहकाने देऊ केलेली किंमत, यातील जी किंमत जास्त असेल त्या किंमतीला भागधारकांचे जास्तीत जास्त हित बघून विकतील. अशा सर्व समभागांच्या विक्रीतून जमा झालेली रक्कम भागधारकांना त्यांच्या समभागांच्या प्रमाणात, उद्गम कर लागू असल्यास तो कापून वाटली जाईल.

ही योजना भागधारकांकडील समभागांना जास्तीत जास्त किंमत मिळण्याच्या दृष्टीने भागधारकांच्या अधिकतम हिताची आहे.

ही कंपनी कृती योजना अंमलात आणण्यासाठी आपली मान्यता टपाली मतदानाने किंवा इ-मतदानाद्वारे देण्यासाठीची सूचना व तपशील नोंदणीकृत पत्त्यावर पाठविली आहे. आपण या योजनेचा विचार करावा आणि योग्य त्या स्तंभामध्ये (✓) अशी खूण करून टपाली मतदान पत्र, त्यावर उल्लेखलेल्या पत्त्यावर व दिनांकापूर्वी पाठवावी ही विनंती.

धन्यवादपूर्वक,
आपला विश्वासू,

दिनांक : ८ मार्च, २०१९

**दि कोल्हापूर स्टील लिमिटेड करिता**
सही/-
**सी. एम. माटे**
(अध्यक्ष)